आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२६ फेब्रुवारी २०२५ बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाशिवरात्रीच्या सणाचा राज्यात सर्वत्र उत्साह/ शिवमंदिरांमधे अलोट गर्दी

- प्रयागराज इथल्या महाकुंभ मेळ्याची आज सांगता

- कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या एकूण सदस्य संख्येत गेल्या डिसेंबरमधे १६ लाखाची भर

- बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगच्या सरपंचांच्या हत्येप्रकरणी विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विदर्भाच्या दानिश मालेवारचं शतक

**<><><><><>**

महाशिवरात्रीचा सण आज राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा होत आहे. भगवान शंकराच्या एकूण १२ ज्योतिर्लिंगांपैकी **पुण्याजवळ** भीमाशंकर, **नाशिकजवळ** त्र्यंबकेश्वर, वेरुळचं घृष्णेश्वर, **हिंगोली** जिल्ह्यातलं औंढा नागनाथ आणि **बीड** जिल्ह्यातल्या परळी इथलं वैजनाथ अशी ५ ज्योतिर्लिंग राज्यात आहेत. आज महाशिवरात्री उत्सवानिमित्त या सर्व मंदिरांमधे भाविकांची गर्दी झाली आहे. सर्व मंदिरे आकर्षक रोषणाई आणि फुलांच्या सजावटीने सजली आहेत. राज्यात महाशिवरात्रीनिमित्त भजन, कीर्तन, पूजा, महाअभिषेक असे विविध धार्मिक कार्यक्रम ठिकठिकाणी आयोजित केले जात आहेत. अनेक ठिकाणी जत्रा भरल्या आहेत.

**नाशिकच्या** त्रंबकेश्वर महादेव मंदिरात दर्शनासाठी राज्यभरातून भाविक दाखल झाले आहेत. आज सकाळी त्र्यंबकेश्वराची महापूजा करण्यात आली. नाशिकच्या इतर शिव मंदिरांमध्ये महाशिवरात्री निमित्तं भाविकांची गर्दी झाली आहे.

**बीड** जिल्ह्यातल्या परळी वैजनाथ इथल्या प्रभू वैद्यनाथाच्या महाशिवरात्र यात्रा महोत्सवाला प्रारंभ झाला आहे. बीड मध्ये विविध शिवालयांमध्ये महाशिवरात्र निमित्त भाविकांची दर्शनासाठी गर्दी आहे.

**मुंबईच्या** बाबुलनाथ सह प्रसिद्ध शिवमंदिरांमध्ये दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी आहे.

**नांदेडमध्ये** शिव मंदिरामध्ये भाविकांनी गर्दी केली आहे. पहाटेपासून ठिकठिकाणी अभिषेक, पूजाअर्चना केली जात आहे.

**लातूरचे** ग्रामदैवत असलेल्या सिद्धेश्वर आणि रत्नेश्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रेला उत्साहात प्रारंभ झाला. २१ दिवस चालणाऱ्या या महोत्सवाला मध्यरात्री दुग्धाभिषेकानं सुरुवात झाली. मध्यरात्री आरतीनंतर भाविकांसाठी दर्शन खुलं करण्यात आलं.

**उत्तराखंडमधल्या** केदारनाथ धामचे दरवाजे २ मे रोजी सकाळी ७ वाजता भाविकांसाठी उघडले जातील, असं आज जाहीर करण्यात आलं.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाशिवरात्री निमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

भगवान महादेवाचे आशीर्वाद सर्व नागरिकांवर राहावेत आणि देश प्रगतीच्या मार्गावर पुढे जात रहावा, अशी कामना राष्ट्रपतींनी समाज माध्यमावर आपल्या संदेशात व्यक्त केली आहे.

महाशिवरात्रीचा सण आत्मनिरीक्षण आणि आध्यात्मिक चेतनेचं प्रतीक असून लोकांना ज्ञान, संयम आणि करुणेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देत असल्याचं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

भगवान शंकराचा हा सण सर्व देशवासियांना समृद्धी आणि चांगले आरोग्य देईल, अशी शुभेच्छा प्रधानमंत्र्यांनी दिल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी देखील महाशिवरात्रीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><>**

जगातला सर्वात मोठा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मेळावा मानला जाणाऱ्या महाकुंभाचा समारोप आज महाशिवरात्रीच्या दिवशी होत आहे. १४४ वर्षातून एकदाच येणाऱ्या या पर्वानिमित्त गंगा यमुना आणि सरस्वती या तीन पवित्र नद्यांच्या संगमावर प्रयागराज इथं करोडो भाविकांनी स्नानाचा लाभ घेतला. पौष पौर्णिमेला सुरु झालेला हा महाकुंभमेळा जगाच्या कानाकोपऱ्यातल्या लोकांसाठी आकर्षण ठरला आहे. सुमारे साडे पासष्ट कोटी भाविकांनी महाकुंभात स्नान केल्याचा प्रशासनाचा अंदाज आहे. महाकुंभात स्नान करण्याची इच्छा असूनही जाऊ न शकलेल्या भाविकांसाठी प्रयागराज इथून संगमातलं पाणी टँकर मधून आणण्याचा उपक्रम भंडारा इथं राबवण्यात आला.

**<><><><>**

महाकुंभ पर्वात देशाचे सांस्कृतिक बंध दृढ करण्यात प्रसारभारतीनं महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचं प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत सेहगल यांनी म्हटलं आहे. या पर्वाचे सर्व ४८ दिवस चाललेल्या कुंभवाणी वाहिनीमार्फत आकाशवाणीने करोडो लोकांशी संपर्क साधला, असं ते म्हणाले….

**होल्ड….बाईट**

देशाची सार्वजनिक प्रसारण व्यवस्था म्हणून आकाशवाणीने या उत्सवात चोख कामगिरी बजावली असं प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी म्हणाले. कुंभवाणीमार्फत कमीतकमी वेळात अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्याच्या आकाशवाणीच्या कामगिरीबद्दल महासंचालक प्रज्ञा पालिवाल – गौर यांनी प्रशंसा केली.

<><><><><>

या महामेळाव्यासाठी प्रशासकीय आणि सुरक्षा यंत्रणा सज्ज होत्या. भारतीय रेल्वेनं देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांसाठी जादा गाड्यांची व्यवस्था केली. आज सकाळी ९ वाजेपर्यंत प्रयागराज मधल्या विविध स्थानकांवरुन मिळून ११५ गाड्या रवाना झाल्या. या गाड्यांमधून सहा लाखापेक्षा जास्त भाविकांनी प्रवास केला असं रेल्वे मंत्रालयाने सांगितलं. आज दिवसभरात सुमारे साडेतीनशे गाड्या सोडण्यात येतील. काल ३१४ गाड्यांमधून १४ लाखापेक्षा जास्त भाविक रवाना झाले. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि रेल्वे मंडळाचे अध्यक्ष सतीश कुमार रेल्वे व्यवस्थापनावर सतत लक्ष ठेवून आहेत.

<><><><><>

मुंबईत होऊ घातलेल्या वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट शिखर परिषदेमधे ट्रेलर मेकिंग स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. व्हिडिओ संपादन, चित्रपट निर्मिती याची आवड असणाऱ्यांसाठी ही स्पर्धा आहे. यात कमीत कमी अठरा वर्षं वयाचे स्पर्धक भाग घेऊ शकतात. ट्रेलर पाठवण्याची मुदत ३१ मार्च पर्यंत आहे. वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट शिखर परिषद मुंबईत १ ते ४ मे या कालावधीत होणार आह. जगभरातल्या माध्यम आणि मनोरंजन उद्योगाचं लक्ष भारताकडे वेधणं हे या समिटचं उद्दिष्ट आहे.

<><><><><>

कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या एकूण सदस्य संख्येत गेल्या डिसेंबरमधे १६ लाखाची भर पडली. ही सुमारे ९ पूर्णांक ७ दशांश टक्के वाढ आहे. केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयानं जाहीर केलेली आकडेवारी सांगते, की नवीन सदस्यांपैकी ४ लाख ८५ हजार सदस्य १८ ते २५ वर्ष वयोगटातले आहेत.

<><><><>

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी राज्य सरकारने ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे. तर, विधीज्ञ बाळासाहेब कोल्हे यांची सहाय्यक विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाज माध्यमावर यासंदर्भातलं परिपत्रक पोस्ट करत ही माहिती दिली.

<><><><>

स्वातंत्र्यवीर वि. दा सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचं स्वातंत्र्य लढ्यामधलं बलिदान, साहस आणि संघर्षपूर्ण योगदान देश कधीही विसरणार नाही, असं मोदी यांनी संदेशात म्हटलं आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त छत्रपती संभाजीनगर शहरात शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं सावरकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आलं.

<><><><>

किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत आत्तापर्यंत दहा लाख कोटी रुपयांहून अधिक कर्ज वितरीत करण्यात आली असून त्याचा फायदा सात कोटी ७२ लाख शेतकऱ्यांना झाला आहे, अशी माहिती केंद्रीय अर्थ मंत्रालयानं दिली आहे. किसान

क्रेडिट कार्ड खात्यांअंतर्गत २०१४मध्ये असलेल्या सव्वा ४ लाख कोटी रुपयांवरून वाढून ती डिसेंबर २०२४ मध्ये दुप्पट म्हणजे १० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाली आहे.

**<><><><><>**

दिल्लीतल्या आम आदमी पार्टीच्या सरकारनं राबवलेल्या मद्यविक्री धोरणामुळे सरकारी तिजोरीतील २ हजार कोटी रुपयांचं नुकसान झाल्याचं कॅगच्या अहवालात म्हटलं आहे. नव्यानं स्थापन झालेल्या भाजपा सरकारने दिल्ली विधानसभेत काल कॅगचा अहवाल मांडला. आप सरकारनं राबवलेल्या या धोरणात अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत. मद्य धोरणामुळे आप सरकारवर टीकेची झोड उठली होती, यामुळे आम आदमी पार्टीचा विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्याचं सांगितलं जातं.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी विदर्भ आणि केरळ यांच्यातल्या अंतिम सामन्याला आज नागपूरमधे सुरुवात झाली. केरळनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. त्यानंतर पहिल्या सत्राच्या खेळात केरळनं अवघ्या २४ धावांमध्येच विदर्भाचे आघाडीचे तीन फलंदाज तंबूत धाडले. मात्र त्यानंतर चौथ्या गड्यासाठी दानिश मालेवार यानं झुंझार शतकी खेळीसह करूण नायर याच्यासोबत दीड शतकी भागिदारी करत विदर्भाचा डाव सावरला. केरळच्या निधीश यानं विदर्भाचे दोन गडी बाद केले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा पहिल्या डावात विदर्भाच्या ३बाद १७२ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज इंग्लंड आणि अफगाणीस्तान यांच्यात पाकिस्तानात लाहोर इथं लढत सुरू आहे. अफगाणीस्ताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे.

या सामन्यात पराभूत होणारा संघ या स्पर्धेतून बाहेर फेकला जाईल. इंग्लंड आणि पाकिस्तान दोन्ही संघ सध्या गट ब च्या गुणतालिकेत तळाला आहेत.

**//<><><><><>//**